DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41, व कलम 51.

4. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.

6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 25.03.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 26/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 4 चे भारत सरकारचे आदेशाचे अनुषंगाने वाचा क्र. 5 अन्वये महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेमध्ये लॉकडाऊनमध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबतची कार्यपद्धती विशद केली आहे. त्याअनुषंगाने वाचा क्र. 6 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केला आहे व या आदेशातील मुद्दा क्र. 4 (12) मध्ये वाचा क्र. 5 चे अधिसूचनेतील मुद्दा क्र. 6 ( f ) नुसार कृषी माल आणि कृषी उत्पादने व कृषीजन्य वस्तुंची आयात-निर्यात चालु राहील असे नमूद केलेले आहे.

ज्याअर्थी **जीवनावश्यक वस्तु उदा. पालेभाज्या, फळे, इ. कृषी उत्पादने व कृषीजन्य वस्तुंचे वाहतुकीकरिता जिल्हा व तालुका स्तरावर शेतकरी मदत/सहायता कक्ष स्थापन** करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **जीवनावश्यक वस्तु उदा. पालेभाज्या, फळे, इ. कृषी उत्पादने व कृषीजन्य वस्तुंचे वाहतुकीकरिता जिल्हा व तालुका स्तरावर शेतकरी मदत/सहायता कक्ष स्थापन करण्याबाबत आदेश देत आहे.**



Scanned by CamScanner

या आदेशानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद व कृषी विकास अधिकारी (जि.प.) उस्मानाबाद यांनी जिल्हा व तालुकास्तरावर शेतकरी मदत/सहायता कक्षामध्ये नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व संपर्क क्रमांकासह जाहिर प्रसिद्धी करावी. तसेच **उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेशी समन्वय साधून** जीवनावश्यक वस्तु उदा. पालेभाज्या, फळे, इ. कृषी उत्पादने व कृषीजन्य वस्तुंची जिल्हांतर्गत व जिल्हयाबाहेरील वाहतुक/आयात-निर्यात सुरळितपणे होईल याबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी दि. 14 एप्रिल 2020 चे मध्यरात्रीपर्यंत आदेशाचे दिनांकापासून तात्काळ चालू करावी.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. कृषी विकास अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
10. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
13. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

27/3/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner